# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.11.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

१ ) महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या एकाच टप्प्यासाठी आणि झारखंड विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी आज सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात

२ ) नांदेड लोकसभा पोटनिवडणूक तसच चार राज्यातील 15 विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकीसाठी ही आज मतदान

३ ) ब्राझिलमध्ये रिओ-दी-जानेरो इथ जी-20 परिषदेचा काल समारोप

४ ) पंतप्रधान आजपासून 3 दिवसांच्या गयाना दौऱ्यावर

आणि

५) 55 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा ला अर्थात ईफ्फीला आजपासून गोव्यात सुरूवात

महाराष्ट्रात विधानसभेच्या 288 जागांसाठी आणि झारखंड मध्ये विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील 38 जागांसाठी नुकतीच, सकाळी 7 वाजता मतदानाला सुरुवात झाली आहे.

महाराष्ट्रात संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून राज्यातील 9 कोटी 70 लाखांहून अधिक मतदार आज आपले लोकप्रतिनिधी निवडणार आहेत.

राज्यात 4 कोटी 69 लाखांहून अधिक महिला मतदार आहेत. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे, तर सुमारे साडे सहा लाख दिव्यांग मतदार आहेत.

राज्यभरात मतदानासाठी एक लाख 427 मतदान केंद्रं उभारण्यात आली असून सर्वाधिक सुमारे साडे आठ हजार मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहेत. तर सर्वात कमी, सव्वा नऊशे मतदान केंद्रं सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. गडचिरोली जिल्ह्यातही एक हजारापेक्षा कमी मतदान केंद्रं आहेत.

**उमेदवार**

राज्यातल्या 288 मतदार संघांमध्ये एकंदर 4136 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत; यात 363 महिला उमेदवारांचा समावेश आहे. विविध 158 पक्षांनी, 2050 उमेदवारांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे, तर उर्वरित 2086 अपक्ष उमेदवार आहेत. सर्वाधिक 237 उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून, वंचित बहुजन आघाडीचे 200 उमेदवार रिंगणात आहेत. भाजपानं 149, मनसेनं सव्वाशे, काँग्रेसनं 101 उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून 95, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून 86, शिवसेनेकडून 81, आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून 59 उमेदवार निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे 93, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे 32, प्रहार जनशक्तीचे 38, माकपाचे 3, एम. आय. एमचे 17, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे 4, जनसुराज्य शक्तीचे 6, शेकापचे 18, समाजवादी पार्टीचे 9 आणि भाकपाचे 2 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.
नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूकीसाठी देखील आज मतदान होत असून या पोटनिवडणुकीसाठी 19 उमेदवार आपलं नशीब आजमावत आहेत.

**झारखंड**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी देखील आज मतदान होत असून या टप्प्यात 12 जिल्ह्यांमधल्या 38 मतदारसंघांचा समावेश आहे. नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या काही संवेदनशील मतदारसंघात दुपारी 4 वाजेपर्यंतच मतदान सुरू राहणार आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या सहाशे तुकड्या संवेदनशील भागात तैनात करण्यात आल्या आहेत. झारखंडचे मुख्य निवडणूक अधिकारी के रवी कुमार यांनी नागरिकांना निर्भयपणे मतदान करण्याच आवाहन केल आहे. झारखंडमध्ये निवडणुकीच्या या दुसऱ्या टप्प्यात विविध पक्षांचे 528 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, सभापती रबीन्द्रनाथ महातो, भाजप प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी आदि नेत्यांच भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे .तसच पंजाब, उत्तरप्रदेश, केरळ आणि उत्तराखंड या चार राज्यातल्या 15 विधानसभा जागांसाठी ही आज पोट निवडणूक होत आहे. या सर्व ठिकाणी शनिवारी 23 तारखेला मतमोजणी होणार आहे

**पंतप्रधान-जी20**

ब्राझिलची राजधानी रिओ-दी-जानेरो इथे सुरू  असलेल्या जी-20 परिषदेचा काल समारोप झाला. कालच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शाश्वत विकास आणि ऊर्जा संक्रमण या विषयावरील प्रथम सत्राला संबोधित केलं. गेल्या वर्षी नवी दिल्लीत झालेल्या  जी-20 शिखर परिषदेदरम्यान, समूहाने अक्षय ऊर्जा क्षमता तिप्पट करण्याचा आणि 2030 पर्यंत ऊर्जा कार्यक्षमतेचा दर दुप्पट करण्याचा संकल्प केला होता, असं पंतप्रधानांनी आपल्या भाषणात नमूद केलं.  शाश्वत विकासाच्या प्रयत्नांना प्राधान्यक्रम देत त्यांना पुढे नेण्याच्या ब्राझीलच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले.

आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी भारताने कोणती पावलं उचलली आहेत याची सविस्तर माहिती दिली. गेल्या दहा वर्षात, निवास, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, स्वच्छ इंधन तसंच सुमारे 11 कोटी 50 लाख परिवारांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या शौचालयांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. दरम्यान, काल परिषदेची सांगता झाल्यावर ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुला दा सिल्वा यांनी दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा यांच्याकडे पुढील परिषदेचं अध्यक्षपद सोपवलं.

**पंतप्रधान-गयाना**

जी 20 परिषदेसाठीचा ब्रझील दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तीन दिवसांच्या गयाना दौऱ्यावर रवाना झाले असून , नुकतेच गयानाची राजधानी . जॉर्जटाउन इथ ते पोहचले आहेत . 1968 नंतर भारतीय पंतप्रधानांची गयाना देशाला ही पहिलीच भेट आहे. या दौऱ्यात पंतप्रधान गयानाचे राष्ट्राध्यक्ष डॉक्टर मोहम्मद इरफान अली यांची जॉर्जटाउन इथे भेट घेतील. दौऱ्यादरम्यान, पंतप्रधान दुसऱ्या करिकॉम-इंडिया शिखरपरिषदेतदेखील सहभागी होतील आणि या परिषदेच्या सदस्य देशांशी भारताची असलेली दीर्घकालीन मैत्री आणखी वृद्धिंगत करण्याबाबत सदस्य देशांच्या नेत्यांची भेट घेतील. उद्या, म्हणजे गुरुवारी पंतप्रधान मोदी गयानाच्या संसदेला संबोधित करणार असून, ते भारतीय समुदायाची भेट घेऊन त्यांनाही मार्गदर्शन करणार आहेत.

**अधिवेशन**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या 25 नोव्हेंबरपासून सुरुवात होत आहे. हे अधिवेशन 20 डिसेंबरपर्यन्त चालेल. त्यापूर्वी 24 तारखेला सरकारनं सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अधिवेशन काळात लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षीय सदस्यांनी सहकार्य करावं, असं आवाहन सरकारतर्फे या बैठकीत करण्यात येणार आहे, अशी माहिती संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली.
दरम्यान , अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल संसदेतील दोन्ही सदनांना भेट देऊन परिसराची पाहणी केली. बैठक व्यवस्था, भोजन व्यवस्था आदींची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी सूचनाही दिल्या.

**अश्विनी वैष्णव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेले रोजगार केंद्रित अभ्यासक्रम राबवणारे गतीशक्ति विद्यापीठ जगात सर्वोत्तम विद्यापीठ ठरेल, असा विश्वास रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला . नवी दिल्लीत या विद्यापीठाच्या कार्यकारिणीची पहिली बैठक अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली झाली , त्यावेळी ते बोलत होते . या विद्यापीठमार्फत उद्योग आणि रोजगार केंद्रित

रेल्वे, विमान , जहाज वाहतूक, महामार्ग आणि संरक्षण क्षेत्रातील अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत.रेल्वे मध्ये भरती होणाऱ्या नवनियुक्त अधिकाऱ्याना या विद्यापीठात प्रशिक्षण दिल जाणार असून,
एमबीएची पदवी दिली जाणार आहे. तसच बोगदा आणि पूल निर्मितीसाठीचा अभियांत्रिकी अभ्यासक्रम, सागरी पायाभूत सुविधा विकास आणि रस्ते विकास अभियांत्रिकी अभ्यासक्रम तसच विमान उड्डाण संचालन यासंदर्भात नवीन अभ्यासक्रम देखिल या विद्यापीठमार्फत राबवण्यात येणार आहेत .

**रेल्वे**

रेल्वे प्रवाश्यांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी या महिन्याच्याशेवटी देशभरातील महत्वाच्या 370 रेल्वेगाड्यांना सामान्य श्रेणीचे 1 हजार नवीन डबे जोडण्यात येणार आहेत . भारतीय रेल्वे मंडळाच्या माहिती आणि प्रसिद्धी विभागाचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप कुमार यांनी काल नवी दिल्लीत माध्यम प्रतिनिधींना ही माहिती दिली .

**ईफ्फी**

पंचावन्नाव्वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात ईफ्फी आजपासून गोव्यात सुरू होत आहे. हा महोत्सव 28 नोव्हेंबरपर्यन्त चालेल. या महोत्सवात 81 देशांचे 180 चित्रपट दाखवले जाणार असून महोत्सव स्थळापासून चित्रपट प्रेक्षागृहापर्यन्त जाण्यासाठी नि:शुल्क सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी काल प्रसारमाध्यमांना दिली. महोत्सवाला ए.आर. रहमान, आर. माधवन, रकुल प्रीतसिंह, पंकज कपूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**हॉकी**

बिहारमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत काल भारतानं जपानचा 2-0 असा पराभव करत स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या गटातील सामन्यात चीननं मलेशियावर 3-0 अशी मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता अंतिम फेरीत भारताचा सामना आज चींनशी होणार आहे.

**हवामान**

देशाच्या वायव्येकडील भागात पुढील पाच दिवस दाट ते घनदाट धुकं राहील असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. तर, तामीळनाडु, पुदूचेरी आणि कराईकल भागात आज मुसळधार

पाऊस पडण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि देशाच्या मध्यवर्ती भागातील तापमानात पुढील काही दिवसात 2 ते 3 अंशांनी घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार